

शैलेश पुरोहित



# वायनाड







ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# वायनाड

लेखक : शैलेश न. पुरोहित

# वायनाड

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# वायनाड

लेखक : शैलेश न. पुरोहित

ए/२, जस्मिन, संत रामदास मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१.

टेली: ९८७०९९०७४३, ८४५२८०३६६३.

ई मेल : shain_p@rediffmail.com shainpu1208@gmail.com

छायाचित्रं : शैलेश, स्वराली, गंधर्व पुरोहित , उल्का वेलणकर व इंटरनेट

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते. सदर प्रवास वर्णनाचा तसेच सोबतच्या छायाचित्रांचा अंशतः अथवा पूर्णतः वापर करण्याआधी लेखकाची लेखी परवानगी आवश्यक आहे.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २ मार्च २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
    - आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
    - हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

वायनाड हे शैलेश पुरोहित यांचे चवथे पुस्तक

श्री. शैलेश पुरोहित यांची इतर पुस्तके

**इंद्रपुरी सिक्कीम**

**नौकुचीयाताल**


**जीवनगौरव (कथासंग्रह)**

नक्की वाचा

1. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sikkim.pdf
2. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/naukuchiatal_shailesh_purohit.pdf
3. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/jeevan_gaurav_shailesh_purohit.pdf









# माझ्या आजवरच्या साऱ्या सहपर्यटकांना अर्पण

# वायनाड



शैलेश न. पुरोहित

**प्रस्तावना**

केरळ तसं छोटसं  परंतु निसर्ग सौंदर्याची मुक्तहस्ते उधळण झालेलं राज्य. कोझिकोडे (कलिकत), वायनाड, कोची, मुन्नार, अलेप्पी, अष्टमुडी, टेकडी, कोट्टायम केरळ बॅक वॉटर. केरळमधील पर्यटन स्थळांची  यादी संपतच नाही. यंदाच्या, म्हणजे २०१९च्या दिवाळीत आम्ही (म्हणजे  हेमंत, उल्का ,  श्रावणी, स्वराली , गंधर्व व मी ) उत्तर केरळ मधील वायनाड येथे गेलो होतो.  'क्यार' वादळाच्या पार्श्वभूमीवर आमची सहल झाली.  केरळला देवभूमी म्हणतात तर उत्तर केरळला 'खाद्यभूमी' म्हटल्यास वावग ठरू नये.  वेळेअभावी आम्ही कलिकत शहरात आलोच नाही त्यामुळे आमची कलिकत शहराची, तिथल्या समुद्र किनाऱ्याची सफर राहिली. तेथल्या गाड्यांवरची फळं, विविध प्रकारची  भजी, तळलेले मासे, सरबतं तसेच इतर पदार्थ खुणवत होते. परंतु त्यांचा आस्वाद घेण्याचे राहिलं. असो. पुढच्या वेळी हे सारं अनुभवायचं. सदर सहलीचा कार्यक्रम ठरवताना किंवा तो प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आम्हाला हरीश बाली यांच्या यु ट्यूबवरील व्हीडीओ ची बरीच मदत झाली. श्री हरीश बाली यांचे मनापासून आभार.

उत्तर केरळच्या वायनाडचे प्रवास वर्णन लिहिण्याचा व ई साहित्याच्या माध्यमातून आपणापर्यंत पोहोचवण्याचा हा एक प्रयत्न. आवडल्यास जरूर कळवा. ई साहित्यने पुन्हा एकदा माझे छोटेखानी प्रवासवर्णन प्रकाशित करून माझा हुरूप वाढवल्याबद्दल ई साहित्यच्या टीमला  मनापासून धन्यवाद .

आपला
शैलेश न. पुरोहित
मुलुंड (पूर्व), मुंबई.

# <u>वायनाड</u>

दर दोन वर्षांनी (जेव्हा सवड मिळेल तेव्हा कोठेतरी) बाहेर जाण्याच्या मालिकेत आम्ही आजवर नौकुचीयाताल ( उत्तराखंड ), गंगटोक (सिक्कीम ), गुहागर (कोकण), देहरादून – मसुरी (उत्तराखंड) इत्यादी करून आलो. या वर्षीची दिवाळी आम्ही वायनाड (केरळ) येथे साजरी केली.

जानेवारी २०१९च्या सुरुवातीलाच एका रविवारी हेमंत वेलणकरच्या घरी दिवाळीत कोठेतरी जाण्यासाठी आमची बैठक भरली होती. पहिल्या बैठकीत आम्ही कोठे जाऊ शकतो याचा केवळ आढावा घेतला. अतुल – अर्पिताने ते या वर्षी सहलीला येऊ शकणार नसल्याचे जाहीर केले आणि आमची पहिली बैठक संपली. पुढच्या एक दोन बैठकांतून वेगवेगळी पर्यटन स्थळं पहात पहात आम्ही पारो (भूतान) , काझीरंगा (आसाम) , कुल्लू – मनाली (हिमाचल), वायनाड ( उत्तर केरळ ) , टेकडी ( केरळ ) यावर येऊन थांबलो. राहुल गांधींमुळे वायनाड माहिती झालेले होते आणि क्लब महिंद्रने तिकडे नवीनच रिसोर्ट सुरु केल्याचे वर्तमान हेमंतने दिले. मधल्याकाळात यु ट्यूब वर विविध ठिकाणचे व्हिडीओ पहिले. ते आमच्या 'पर्यटन' ग्रुपवर शेअर केले. हरीश बालीचे वायनाड विषयक व्हिडीओ बघितले आणि आम्ही देवभूमी केरळला – वायनाडला – जायचे पक्के केले. आजवर आम्ही दिल्लीहूनच उत्तरेतील विविध स्थळ पहिली होती. मुंबई – दिल्ली प्रवासासाठी रेल्वे, विमानं भरपूर असल्याने काही प्रश्न आला नव्हता. त्यामानान मुंबई – कोझिकोडे (कलीकत) विमानं खूपच कमी. रेल्वेने जायला गाड्या भरपूर परंतु दिवस दिवस घेणाऱ्या. खर म्हणजे गंधर्वला रेल्वेचं आकर्षण परंतु आमच्या नोकऱ्या आम्हाला ५-६ दिवसांपेक्षा जास्ती दिवस देत नव्हत्या म्हणजे प्रवासात वेळ घालवण्याची चैन परवडणारी नव्हती. तेव्हा दिवाळीची सुट्टी पकडून आधी दोन – तीन दिवस निघून भाऊबीजेला परतायचं असें ठरले. दिवाळीचे दिवस असल्यामुळे कदाचित असू शकेल, विमानाची तिकीट ही स्वस्तात मिळाली. तेव्हा पहिली आम्हा ६ जणांची तिकीट काढली. क्लब महिन्द्रचे बुकिंग सहा महिने आधी – समजा नाही मिळालं तर ? – आमच्यातली 'मध्यमवर्गीय नकारात्मकता' चुकचुकलीच. हरकत नाही, महिंद्रने नकार दिलाच तर दुसरी हॉटेल्स पाहून ठेवली होती. पण तसे

काही झाले नाही. आणि आम्ही २४ ऑक्टोबरला सकाळी ६.५०च्या एअर इंडिया ने जायची आणि २९ ऑक्टोबरला ११.५० च्या इंडिगोची परतीची तिकीट ताब्यात घेतली.

वायनाड हे उत्तर केरळमध्ये कोझिकोडे (कालीकत) येथून ८६ किमी अंतरावर, कल्पेट्टा येथे त्याचे प्रशासकीय कार्यालय. मंथनवडी, सुलतानबाथेरी व वायतीरी तालुके मिळून वायनाड जिल्हा तयार झाला. वायनाड हे नाव 'वायल नाड' (land of paddy fields) या मल्याळी शब्दावरून पडले.

तिकडे गेल्यावर काय काय पहायचे याची उजळणी झाली. क्लब महिंद्रला ई मेल पाठवली. त्यांनी त्याला उत्तर म्हणून ढोबळ ‘आयटनरी’ पाठवली. हेमंतने ती शेअर केली. २४ तारखेला दुपारी कोठे जायचे, २५ ला काय करायचे याचे वेळापत्रक मनात तयार ठेवले. त्याप्रमाणे महिंद्रला २४ ला सकाळी कालिकत विमानतळावर गाडी पाठवायला सांगितली.

यंदा पावसाने चांगलाच उच्छाद मांडला होता. गणपती- नवरात्री – दसरा झाला तरी बेटा थांबायला तयारच नाही. त्यातच गंधर्वने बातमी आणली २६ – २७ ऑक्टोबरच्या सुमारास अरबी समुद्रात एक वादळ तयार होतंय आणि ते ओमानच्या दिशेन जाणार. तात्पर्य त्या आठवड्यात संपूर्ण कोकणात पाऊस असेल . झालं आम्ही टेन्शनमध्ये पुन्हा फोनाफोनी झाली. काय करायचं, काही कळेना. संपूर्ण सहल रद्द करणं परवडणारे नव्हते. अखेर अती पाऊस असल्यास हॉटेलमध्येच थांबू व नंतर पुन्हा सवडीने वायनाडचा कार्यक्रम आखू परंतु आता वायनाडला जायचच असे ठरले. तरीही गंधर्व पावसावर लक्ष ठेऊन होता व वेळोवेळी अपडेट्स देत होता.

२३ ऑक्टोबरला सारी काम संपवून निघालो. रात्री ‘के बी सी’ न पहाताच झोपलो, सकाळी पावणे पाचला टॅक्सी बोलावली होती ना ! ५.२० – ५-२५ च्या सुमारास विमानतळावर पोहोचलो आणि एअर इंडियाच्या भोंगळ कारभाराचा झटका बसला. वास्तविक पहाता आम्ही वेब चेक इन आधल्या दिवशीच केले होते, विमानतळावरील किओस मशीनवर बोर्डिंग पास बॅगेज टॅग्ज छापून घेतल्या होत्या.

मुंबई – कलिकत साठीच्या प्रवाशांच्या बॅगा E-14 या खिडकीत स्वीकारणार असे खिडकीवर लिहिले देखील होते. परंतु दिल्ली, लखनौ, बंगळूरू, चेन्नई, कोहीकोड थोडक्यात सकाळी साडे सहा ते साडेसात दरम्यान भारतात कोठेही एअर इंडियाच्या विमानाने जायचे असल्यास प्रवाशांनी एकाच रांकेत उभं राहायचं आणि आपला नंबर आल्यावर त्या खिडकीत जायचे. सत्तेपुढे शहाणपण नसते हेच खरे. यथावकाश ६.५० ला उडणारे विमान प्रत्यक्षात ७.२५ ला कलीकतकडे झेपावल. उड्डाणा नंतर स्थिरस्थावर झाल्यावर जाणवलं की आमचं विमानं व पृथ्वी यांच्यामध्ये ढगांचा दाट पडदा असल्यामुळे खालचं काहीही दिसत नव्हत. ८.१५ च्या सुमारास विमान कराडच्या पुढे गेलं आणि नाष्ट्याचे वाटप झालं. मधल्या मार्गिकेला लागून माझ आसन असल्यामुळे शेजारच्या रांगेत बसलेल्या एकाच कुटुंबातील तीनजण मला स्पष्ट दिसत होते. त्यातल्या मधल्या व्यक्तीन नाष्ट्यासोबत दिलेले प्लास्टिकचे चमचे, फोर्क चक्क आपल्या हँड बॅगमध्ये टाकतांना मी पाहिलं, पुढच्या रांगेतील एका मुलीने योगर्टचा कप आपल्या बॅगेत चक्क हवाई सुंदरी समोर ठेवताना पाहिलं आणि आम्हा भारतीयांची ‘चिंधी चोर’ मनोवृत्तीपाहून किळस आली. पुढच्या प्रवासात असेच काही अनुभव आले, ते वेळोवेळी वाचायला मिळतील. खरच आम्ही भारतीय असे का वागतो ? ती एक विकृती आहे हे आमच्या लक्षात येतच नाही का ?

असो. कलिकत जवळ येताच सीट बेल्ट बांधण्याची सूचना वैमानिकाने केली, हळूहळू ढगांच्या पडद्यातून विमानं जमिनीकडे येऊ लागलं आणि चहूकडे हिरवीगार झाडी दिसू लागली. अधूनमधून घरं दिसत होती. वरुन चिमुकल्या दिसणाऱ्या झाडांचे आकार अचानक मोठे होत गेले आणि विमान धावपट्टीवर धाऊ लागल्याच लक्षात आलं.कालिकतला विमानं १० मिनिटे आधीच पोहोचल.



कोझीकोडे येथे विमान उतरतानाचे प्रातिनिधिक छायाचित्र

रमत-गमत, निसर्ग सौंदर्य पहात आम्ही साडेबारा – पाऊणच्या सुमारास वैतीरी व्हिलेज या रिसॉर्टला

पोहोचलो. दरवाज्यात आमच स्वागत चापून चोपून साड्या नेसलेल्या दोन नाजुकचणीच्या केरळी मुलीनी व दोन तरुणांनी केले (बहुतेक हॉटेल मॅनेजमेंटचे विद्यार्थी असावेत) केले. स्वागत कक्षांत इतर सोपस्कार पूर्ण होईस्तोवर आम्हाला छानसा  लेमन टी देण्यात आला.

लगेच आम्ही आमचा मोर्चा ‘ट्रॅव्हल डेस्क’ कडे वळवला. तर तिथल्या मुलीने आम्हाला माहिती दिली की, “गेले काही दिवस संध्याकाळी पाऊस पडतो आहे, तेव्हा मी तरी तुम्हाला बाहेर न जाण्याचा सल्ला देईन.” बाहेर तर छानसं ऊन पडलं होत. असो.


स्वागताला सज्ज असणारे तरुण - तरुणी



वैथिरी व्हिलेज रिसॉर्ट

स्वागत कक्षापासून आमच्या खोल्या २५०—३००मीटर अंतरावर होत्या. तेथे जाण्या — येण्यासाठी इको गाड्या होत्या. तेथपर्यंतचा रस्ताही हिरव्या गर्दझाडीने व्यापलेला होता.

साडेतीन चारच्या सुमारास खरोखरीच गडगडाटासह पाऊस सुरु झाला. आणि आमच्या बाहेर जाण्याच्या मनसुब्यांवर अक्षरशः पाणी पडलं.





दुसऱ्या दिवशी आम्ही पुट्टु राईस, कडला करी, मसाला बोंडा, अप्पम चा नाश्ता करून उरकून गाडीत जाऊन बसलो. "मै, महम्मद रफिक, आपका गाईड कम ड्रायव्हर ", अशी सुरुवात करीत महम्मद ने आम्ही कोठे कोठे जाऊन आल्याचे विचारले. आमचा हा पहिला दिवस आहे हे समजल्यावर त्याने आमचा व गाडीचा ताबा घेतला. "साब इधरको शाम मी बारीश आता, उससे पैले हम ज्यादासे ज्यादा स्पॉट पे जानेका कोशिस करेगा". " हम पैला बनासुर सागर डॅम देखेंगा". वायनाड जिल्ह्यात कल्पेट्टा पासून २१ किलो मिटर्सवर बाणासुर टेकड्यांच्या पायथ्याशी या मातीच्या धरणाची निर्मिती १९७९ साली मुख्यतः कक्क्यम हायड्रो वीज निर्मितीसाठी, सिंचनासाठी व लगतच्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बांधण्यात आले. बाणासुर हा केरळचा, महाबली या





हिंदुराजाचा मुलगा . सदर धरणाच्या मुख्य दरवाजापासून धारणा पर्यंत जायला बंद जीप्सची सेवा होती. अर्थात त्याचे वेगळे पैसे भरायचे. आम्ही जीपमध्ये बसलो आणि जोराची पावसाची सर आली.

धरणाजवळ येऊन तर पोहोचलो. पाऊस थोडा कमी झाला. पळतच धरणापासून २५० – ३०० फुटांवर असलेला आडोसापाहून पाऊस थांबण्याची वाट पहात उभे राहिलो. धरणावर त्यांनी सोलर पॅनेल्स लावली होती. कोणत्यातरी कॉलेजचे १०० एक विद्यार्थी तेथे थांबले होते. पाऊस थांबताच ते झपाट्याने उतरून गेले. धरणावरील रस्त्याच्या एकाबाजूला निळेशार पाणी तर दुसऱ्याबाजूला हिरवीगार वनराई, नुकतीच पावसाची सर येऊन गेलेली, आकाशात ढगांशी सूर्य लपाछपी खेळत होता. पाण्यावरून येणारा थंड वारा. दूरवर डोंगर हिरवी शाल पांघरून बसले होते. पाण्यात दूरवर एक मोटरबोट फिरत होती. निसर्गानी रेखाटलेले नेपथ्य मंत्रमुग्ध करणारे होते. स्वराली, गंधर्व आधाशासारखे फोटो काढत होते. बराच वेळानी आम्ही धरणावरून काढता पाय घेतला. तेथून आम्ही ‘स्पाईस गार्डन’ पहाण्यास गेलो. केरळ हे मसाले व चहाच्या मळ्यांसाठी प्रसिद्ध. वायनाडच्या रस्त्यांवर दुतर्फा चहाच्या बागा दिसतात.



पुन्हा एकदा आम्हाला पावसाने गाठलं आता आम्ही ‘छत्रपती’ बनून मसाला उद्यानात फिरत होतो.  पाच वेगवेगळ्या प्रकारच्या तुळशी असतात हे तेथे प्रथमच समजत होते. तसेच वेलची, तमालपत्र, दालचिनी वगैरेंची उपयुक्तता व विविध औषधांत त्याचा केला जाणारा उपयोग हे सारं आम्हाला नवीनच होते. ते आम्ही ऐकत होतो, साठवत होतो.  एकमात्र खर,  मसाल्याचे पदार्थ केरळात जरी उगवत असले तरीही तेथेही त्याच्या किमतीत जास्तच वाटल्या.

आता जेवणाची वेळ झाली होती, कडकडून भूक ही लागली होती. उत्तर केरळ ‘फुडीज’ साठी नंदनवनच आहे. पुट्टु राईस सोबत फिश करी किंवा कडला करी (म्हणजे काळसर अख्या चण्याची रसदार उसळ ) किंवा पुरी आणि कडला करी. गरमागरम अप्पम, नारळाच्या चटणी सोबत किंवा कोणत्याही करी सोबत खा, मसाला बोंडा, अवियल, स्ट्यू, बांबू राईस, रसम, सांबार हे शाकहारींसाठी . आणि मांसहारींसाठी माशांचे विविध प्रकार, विशेषतः झिंगा, मटणाचे विविध प्रकार.  मुसलमान व कॅथलिक बहुल भाग असल्याने मांसहारींना जिभेवर ताबा ठेवण एकंदरीत कठीणच. शिवाय खोबरेल तेलात तळलेले कच्च्या केळीचे वेफर्स, फणसाचे गरे , पिकलेल्या केळ्याचे वेफर्स (चिप्स) रीसॉर्टमध्ये एका सकाळी उकडलेली कच्ची केळी होती ब्रेकफास्टला. अक्षरशः कायकाय खाऊ आणखी किती खाऊ असे होऊन जात असे.

केरळात जरी पुट्टु राईस हा सकाळच्या न्याहारीला खात असले तरी मी आज पुट्टु राईस विथ कडला करी दुपारी  घेतली. पुट्टु राईस म्हणजे तांदूळ किसलेल्या नारळासोबत शिजवतात, मध्येच हलकेसे जिरे,  एक वेगळीच चव येते. सोबत नारळाची चटणी किंवा कडला करी किंवा फिश करी. केरळात जरी मसाल्यांची रेलचेल असली तरीही मोठी हॉटेलं सोडा परंतु रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या छोट्या हॉटेलात सुद्धा अन्न जळजळीत किंवा तिखटजाळ नसल्याचे जाणवले, आणि कडीपत्त्याचा सढळ वापर आढळला त्यामुळे अन्नाला एक स्वाद येतो. बहुतेक ठिकाणी कॉफी म्हणून bru कॉफीच होती, फिल्टर कॉफी एक दोन ठिकाणीच मिळाली.

तेथून आम्ही चहाचा कारखाना पहायला गेलो. आर पी गोएंका समुहाच एक युनिट होते ते. सी टी सी डस्ट बनवीत होते. हिरव्यागार चहाच्या पानांच्या सुगंधाने संपूर्ण आसमंत भरून राहिला होता. हा अनुभव पाहिल्याप्रथमच घेत होतो. हेमंत – उल्का श्रीलंकेला जाऊन आल्याने त्यांना काहीशी माहिती होती. बहुतेक हॉटेलात अशाच प्रकारचा डस्ट चहा वापरला जातो. चहाचं पानांपासून बारीक पूड होण्यापर्यंत बदलत जाणार रूप पहाण्यासारख आहे,

तिकडून आम्ही पुक्कुड लेक पहायला गेलो. तेथे पेडल बोटिंगची सोय होती. परंतु पावसाने पुन्हा एकदा आम्हाला माघार घ्यायला लावली व आम्ही तेथील मत्सालय पाहून गाडीत येऊन बसलो आणि पुन्हा  धो धो ....

शुक्रवार रात्रीपासूनच क्यार वादळाच्या पावसाने जोर धरला होता. परंतु शनिवारी सकाळी उघडीप होती. सकाळी लवकरच मी व हेमंत रिसोर्टच्या आजूबाजूला आज लोकल नाश्ता करायच्या उद्देशाने बाहेर पडलो. पाऊस भुरूभुरू सुरु झाला होता. बाहेर मुख्य रस्त्यावर आलो तो इंडिया गेट हॉटेल दिसलं. त्याला विचारलं केरळी पद्धतीचा नाश्ता मिळेल काय ? तो हो म्हणताच. उल्का – श्रावणी - स्वराली व गंधर्व यांना बोलावून घेतलं. मस्त वाफाळता नाश्ता व चहा ढोसला. नऊ - साडेनवाच्या सुमारास गाडी येणार होती श्रावणी , स्वराली व गंधर्व रिसोर्टवर परत गेले, तर मी हेमंत व उल्का बाजारात फेरफटका मारावा म्हणून पुढे गेलो. इंडिया गेट उपाहारगृहाच्या एक छोटासा नाला होता, जो आमच्या रेसोर्टमधून येत होता. त्यावरील पूल ओलांडून पुढे आल्यावर बाजारपेठ दिसली. समोरच वायनाड बस स्थानक होते. त्याच्या आजूबाजूला ग्रामोद्योग तसेच माशांची दुकानं होती. विविध प्रकारचे ताजे, वाळवलेले मासे मांडले होते. विविध प्रकारच्या माशांचा संमिश्रवास, आम्हाला कोकणात असल्याची जाणीव करून देत होता. पुढे अनेक जनरल स्टोअरमध्ये भाजी विकायला ठेवलेली आम्ही पाहिली हे दृश्य जरा हटके वाटलं. तसच माशांची दुकानं देखील वेगळीच वाटली.








आता पाऊस वाढू लागला आणि आम्ही रिसोर्टवर परतलो. आमच्या खोल्यांत आम्ही पोहोचलो आणि अगदी आषाढात पडावा तसा पाऊस कोसळू लागला. आमच्या खोल्यांच्या जवळून एक नाला वहात होता त्यातून वाहणाऱ्या पाण्याच्या आवाजाने वातावरण आणखीच गंभीर केले. दिवसभर पाऊस राहणार अशी चिन्ह दिसू लागली. अखेर साडे नऊ – पावणेदहाच्या सुमारास महम्मद रफिक या ड्रायव्हरला आजचा कार्यक्रम उद्या करू असे सांगून रिसोर्टवरच बसून राहिलो. दुपार नंतर पाऊस ओसरला. तो दिवस रिसोर्टवरच टेबल टेनिस, कॅरम वगैरे खेळण्यात घालवला.

खर म्हणजे आम्हाला चेंब्रा पिकला जाण्याची खूप इच्छा होती. समुद्रसपाटीपासून २१०० मिटर्स उंच. हृदयाच्या आकाराचा तलाव. तेथे पोहोचण्यासाठी गर्द झाडीतून जाणारा रस्ता. ट्रेकिंगसाठी प्रसिध्द. पण हाय पावसामुळे प्रशासनाने तेथे जायला मज्जाव केला होता.

कुरुवाद्वीप : साधारणतः ४ चौरस मीटर क्षेत्राचे हे एक छोटेसे बेट. काबानी नदीत हे बेट आहे. काल्पेत्ताहून नदीच्या किनारी यायचे तिथून बांबूच्या छोट्याशा बोटीतून बेटावर जायचे. निसर्गासोबत हुंदडायचे. एक मात्र लक्षात ठेवायचे प्लास्टिक किंवा प्लास्टिकच्या वस्तू अजिबात सोबत न्यायच्या नाहीत. कॅमेरा असल्यास कॅमेराचे तिकीट काढा.

सनराईज व्हॅली : सुलतान बाथेरीपासून २० किलोमीटर्सवर ही जागा आहे. वायनाडहून जायचे तर पहाटे चार वाजता निघावे लागते. वायनाडला जाणाऱ्या पर्यटकांनी जावेच असे ठिकाण. आजूबाजूच्या हिरव्याकंच डोंगरांमधून सूर्य उगवताना पहाण हा एक अनुभव आहे.

रविवारी लक्ष्मी पूजन होते. सकाळी जुजबी फराळ आटोपून एड्क्कल केव्हजच्या दिशेने कूच केले. केरळमध्ये एक वेगळाच अनुभव आम्ही सकाळ संध्याकाळ घेत होतो. तुम्ही शहराच्या बाहेर पडताच तुम्हाला हिरवीगार वनश्री वेढुन टाकते. वायनाड, कल्पेट्टा, सुलतान बाथेरी, मुकम शहरं केव्हा व कोठे सुरु होतात व कोठे संपतात याचा अंदाजच लागत नव्हता. कल्पेट्टाच्या रस्त्यावर शुध्द शाकहारी उडिपी रेस्तराँ दिसले आणि आमच्या गाडीतल्या मधल्याफळीने गाडी थांबवण्याचा आदेश दिला. रस्सम वडा, उपमा, उत्तपम आणि फिल्टर कापी. वा ! तृप्तीची ढेकर देत बाहेर पडलो.

नाश्ता करून आम्ही वायनाड हेरीटेज म्युझियमकडे गेलो.  तेथे एकंदरीत वायनाड विषयी माहिती, तेथील शेतीची अवजारे , लोकांची राहण्याची पद्धती वगैरे माहिती तसेच जुनी शिल्पं, मूर्ती पाहिल्या.




तेथून आम्ही अग्रीकल्चर म्युझियम पहायला गेलो. कृषी विषयक विविध प्रयोग केले जातात येथे.



कल्पेट्टा, सुलतान बथेरी करत साधारणतः तासाभराने आम्ही एड्क्कल केव्ह्सला पोहोचलो. पार्किंगपासून तेथे पोहोचण्यासाठी अत्यंत उभा असा चढ पारकरून सुमारे १५० पायऱ्या चढाव्या लागतात. तेथे पोहोचल्यावर मात्र पोहोचल्याचे सार्थक झाल्याचे समाधान लाभते. अनेक शतकांपासुन म्हैसूरहून केरळच्या किनारपट्टीला जाण्यासाठी या मार्गाचा उपयोग होत असे. येथे नैसर्गिकरित्या शिळा तयार झालेल्या आहेत अशा प्रकारच्या शिळा मला मध्यप्रदेशातील पचमढी येथे रिजगढ येथे पाहायला मिळाल्या. दोन छायाचित्र देत आहे.





ही शिल्पे बरीच जुनी असावीत. परंतु त्यांचा शोध १८८४ साली एका ब्रिटीश अधिकाऱ्याला लागला. आज बांबू राईस करी खाण्याचा योग असावा. बांबू श्युट राईस हा प्रकार आम्ही गंगटोक येथे गेलो होतो तेव्हा खाल्ला होता. केरळात या तांदळा विषयी माहिती मिळाली ती अशी. बांबूचे झाडाचे आयुष्य ४० वर्षे. झाड मरण्यापूर्वी त्यातून एक प्रकारचा तांदूळ येतो. तोच बांबू राईस. निसर्गाची किमया पहा, झाडंसुद्धा जगाचा निरोप घेताना काहीतरी देऊन जातात.

दुपारी अडीच वाजता हेमंत व मी वायनाडच्या मुथांगा अभयारण्याच्या दारात जीपच्या प्रतीक्षेत उभे होतो. तीन वाजता तिकीट खिडकी उघडणार परंतु दोन वाजल्यापासून लोक रांगेत उभे. मल्याळम भाषेत बरेच काहीसं लिहिले होते. आम्ही आपले त्या कक्षात लावलेली अभयारण्यातील प्राण्यांची चित्र पहात वेळ काढीत होतो. केवळ २० जीप सोडणार असल्याचे समजले. तीन वाजता तिकीट खिडकी उघडली, एका व्यक्तीला जास्तीतजास्त ७ तिकिटे मिळतील असे जाहीर झालं. मी सारखा रांगेतली माझ्यापुढे असणारी माणसे मोजत होतो. निश्चितच जास्त माणस होती. २० व्या जीप मध्ये ही नंबर लागण्याचा संभाव नव्हता. परंतु आशा वेडी असते ! आमच्या आधी उभे असलेल्या दोन- दोन जणांच्या गटांना एकत्र करीत सहा जणांची एका जीपमध्ये वर्णी लागली आणि आमचा नंबर आला. माणशी १६० रुपये अधिक केरळ फ्लड सेस मोजून आम्ही जीपकडे धावलो. तिकडे जीपचे ७२० रुपये द्यायचे होते. नंतर लक्षात आले तिकीट बाबूने १० रुपये कमीच दिले. आमच्या जीपचा ४० पैकी ३८ वा नंबर ( सकाळी २० व संध्याकाळी २० अशा ४० जीप सोडल्या जातात असे समजले). साडे तीनच्या सुमारास आम्हाला घेऊन जीप निघाली. जरी पाऊस नसला कडकडीत ऊन असले तरीही प्राणी कितपत दिसतील या बद्दल आम्ही साशंक होतो. पर्यटकांचा भ्रमनिरास होऊ नये म्हणून प्रशासनाने तीन – चार हत्ती साखळीला बांधून ठेवलेले पहिले. पुढे चालकाने जीप ज्या प्रकारे चालवली की आम्ही क्रॉस कंट्री रॅलीत भाग घेतलेल्या वाहनात बसलो तर नाही ना ! असा भास झाला. सुमारे ४० मिनिट जंगलातून प्रवास केल्यावर अचानक आमची जीप म्हैसूर – वायनाड रस्त्याला लागली. मला वाटत ५० – ५५ मिनिटांत आम्ही जंगल सफारीचा उपचार करून ३ – ४ बांधलेले हत्ती पाहून परतलो. अजूनही तिकीट खिडकीजवळ लोक उभे होते. म्हणजे २० जीप वगैरे निव्वळ कागदावरच . नकळतपणे ताडोबा , पेंच, राजाजी राष्ट्रीय उद्यानाच्या सफरींची तुलना झाली आणि येथल्या जंगल सफारीचा

फोलपणा उघड झाला. तेथे गेलेल्या इतर पर्यटकांचा  कदाचित वेगळा अनुभव असू शकेल परंतु आम्ही जे अनुभवले ते येथे नमूद केले. ताडोबा – पेंच – राजाजी येथील चालक, गाईड पर्यटकांना जंगलाच्या विविध भागातून फिरवीत, माकडांच्या – साम्बाराच्या कॉलिंगचा मागोवा घेऊन जनावर कोठे आहे तेथे वाहन नेण्याचा प्रयत्न करीत. पर्यटकांना जंगलातील पशु पक्षांचे दर्शन घडावे यासाठी प्रयत्न करीत. वायनाडला तसे काही आढळले नाही.

येताना कल्पेट्टा हे एक लहानसे शहर लागलं. तिथल्या रस्त्यांवरून फिरताना अगदी पुण्याच्या लक्ष्मीरोडवर फिरल्यासारख वाटलं.






तेथून मी, स्वराली व गंधर्व रिसॉर्ट जवळून ऑटो रिक्षा करून ‘लक्कीडी व्ह्यू पॉईंटला’ गेलो. कलिकतहून वायनाडकडे येताना घाट चढून वर आले की हा लक्कडी व्ह्यू पॉईंट आपल्याला काहीकाळ वाहन थांबवून उभं रहायला भाग पाडतो. म्हणजे कसं पुण्याहून मुंबईकडे येताना राजमाची टोकावर थांबत ना, किंवा कोल्हापूरहून कोकणात येण्यासाठी गगनबावडा घाटातून जाणाऱ्या वळणदार रस्त्याचं दृश्य कसं पाहायला आपण थांबतो. लक्किडी व्ह्यू पॉईंटची ही काही दृश्य.  वायनाड म्हटले की खाली दिलेले चित्र दिसत.











दिवेलागणीच्या सुमारास तर तो भाग इतका भारी दिसतो ना की पहात रहाव. संध्याकाळी अवियल विथ अप्पम अंड केरला राईस विथ सांबार खाण्यचा योग जुळून आला. केरळी अवियल म्हणजे सोप्या मराठीत मिकसं वेजिटेबल करी विथ कोकनट अंड योगर्ट. अवियल बनवताना केळफूल, सुरण, गाजर, बटाटे, शेवग्याच्या शेंगा, काकडी. या भाज्यांचे लांब काप करून हळद व मिठासह उकडतात, शिजल्यावर त्यात नारळ, जिरे, हिरवी मिरची व योगर्ट यांचे मिश्रण घातले जाते व वरून कडीपत्ता युक्त खोबरेल तेलाची फोडणी दिली जाते. सुवासानेच भूक चाळवलीच पाहिजे. सोबत गरम गरम अप्पम . त्यानंतर केरळ राईस आणि सांबार , क्या बात है| केरळचा तांदूळ किंवा भात काहीसा

कुरमुरयाचा आकाराचा आणि वर सांबार.  बदल म्हणून ठीक आहे. एरवी साधा भात आणि सांबारला निश्चितच झुकत माप.

आज सोमवार , एड्क्कल केव्ह्ज जवळ असणारे एड्क्कल हर्मिटेज रिसॉर्ट  पहायचे राहूनच गेले ते , सीतामाता मंदिर करायचे होते. पुन्हा उडिपीचा नाश्ता करून सीतामाता मन्दिर पाहण्यास गेलो. वायनाड अभयारण्याच्या पुढे दोन एक किलोमीटर्सवर ही जागा आहे.  श्री रामाने सीतेचा त्याग केल्यावर सीता वाल्मिकी ऋषींच्या आश्रमात रहात होती. हा आश्रम सीतामाता मंदिरापासून तीन किलोमीटर्सवर आहे. या आश्रमातच लव – कुश यांचा जन्म झाला. तसेच एड्क्कल गुहांच्या परिसरात ते धनुर्विद्या शिकल्याचे सांगितले जाते. सीतामाता मंदिरात प्रसाद म्हणून पायसम मिळाले.





एड्क्कलचा रस्ता गाठला.  साडे बाराच्या सुमारास एड्क्कल हर्मिटेज रिसॉर्टला पोहोचलो. हे एक इको फ्रेंडली रिसॉर्ट आहे. एकंदर ११ खोल्या आहेत. दर सुद्धा परवडेबल आहेत. रेल्वे स्थानक – विमानतळापासून पिक अप  ड्रॉपची सोय आधी कळविल्यास आहे. याचे आणखी एक यु एस पी म्हणजे तेथील गुहेमध्ये १०० – १२५ मेंणबत्त्यांच्या प्रकाशात तुमची भोजनाची व्यवस्था होऊ शकते. आणि तुम्ही आधी कळविल्यास तुम्हाला केळफुलांच्या भज्यांचा आस्वाद सुद्धा घेता येतो बरे ! केळफुलाची भजी . एड्क्कलला गेल्यास एक वेगळीच डीश,  अवश्य चाखावी अशी.  सदर प्रवासात पावसाने सतत आमची सोबत केल्याने व गुहेत पाणी साचल्याने आम्हाला गुहेतील भोजनाचा  अनुभव घेता आला नाही.  गुगलवर नाव टाकल्यास या रिसोर्टची  वेबसाईट मिळते,  ठरवून जा आणि काय वाटत ते अवश्य कळवा.



हे छायाचित्र एका खोलीच्या समोरून काढले आहे. सूर्योदय– सूर्यास्त पहात दिवसभर , निरव शांतता अनुभवत येथे येऊन रहाण्यात जे सुख आहे ते अनुभवावेच .



परतीच्या प्रवासात कल्पेट्टा येथे खरेदीसाठी ‘महाराणी’ नावाच्या दुकानात गेलो त्या चार मजली दुकानाचा प्रत्येक मजला हा २००० – ३००० चौरस फुटांचा असून मुलांसाठी, मुलींसाठी, स्त्रियांसाठी व चौथा मजला पुरुषांच्या पोशाखासाठी राखून ठेवलेला. जेथे पारंपारिक पोषाखापासून अत्याधुनिक पोशाखापर्यंत सारं काही उपलब्ध होते. आणि दुकान म्हणजे पुण्यातलं ‘जयहिंद’ किंवा मुंबईतील परळच्या हिंदमाता जवळच्या ‘भरतक्षेत्र’ अथवा ‘आसो पालव’ची आठवण व्हावी. संपूर्ण मजल्यावर आम्ही सहाजण ( वायनाड येथे दिवाळीचा सण असा जाणवलाच नाही. कोठेही रोषणाई नव्हती, की फटाके नव्हते, ओणम तेथे मोठ्याप्रमाणावर साजरा होतो असे समजले) होतो आणि आमच्या मागे एक मुख्य विक्रेती मुलगी व तिला सहाय्य करणाऱ्या इतर जणी.

पुन्हा एकदा लक्कडी व्ह्यू पॉईंटला भेट देण्याचा मोह टाळू शकलो नाही आणि चालकाला गाडी तेथे घ्यायला सांगितली. संधीप्रकाशात दरीतून धुक्याचे ढग वर येतानाचे दृश्य अवर्णनीय. जो जिवंतपणा आपल्याला डोळ्यांना दिसतो तो कितीही चांगला कॅमेरा असला तरी छायाचित्रात दिसत नाही. असेच दृश्य आम्ही नथुला पासहून गंगटोकला परतताना पाहील्याचे आठवले. परंतु तेथे चीनची सीमा जवळ असल्याने वाहन थांबवण्याची परवानगी नव्हती. म्हणून काहीशा मर्यादा आल्या.

आम्ही उभे असताना ते धुक्याचे ढग केव्हा वर आले समजलेच नाही आजूबाजूचा संपूर्ण आसमंत धुक्याने व्यापला आणि आम्ही आमच्या मुक्कामी परतलो. आता स्ट्यूचा आस्वाद राहिला होता. स्ट्यू : खास केरळी भाजी. खोबरेल तेलात लवंग, दालचिनी, वेलची, काळ‍ं मिरी या साऱ्याचा संमिश्र घमघमाट होईस्तो तळावे. त्यात हिरवी मिरची, आलं, लसूण व बारीक चिरलेला कांद्याचे मिश्रण कढईत परतले जाते. कांदा चांगला शिजल्यावर गाजर, बटाटे, फरसबी, मटार आणि नारळाचे दुध व थोडे पाणी मिसळून मंद आचेवर हे मिश्रण शिजवले जाते, त्यात पुन्हा नारळाचे दुध घातले जाते. आता हे स्ट्यू अप्पम अथवा भातासोबत मस्त लागतं.

उद्या मंगळवारी मुंबईला परतायचे. काबिनी नदीच्या किनारयावर असणारे कुरुव बेट पावसामुळे बंद होते, चेंब्रा पिकला जाण्यासाठी दोराला पकडून चढत जावे लागते, निसरडे असल्याने तेथे जायला बंदी होती. तसेच सुचीपारा धबधबा पाहण्यास आम्ही मुकलो पावसाळी वातावरण असल्याने सनराईज

पॉईंट देखील पहायचा राहिला. त्याकरिता पाहते चारच्या सुमारास जावे लागते. मनातल्यामनात पावसाचा उद्धार करीत रात्री झोपी गेलो.

२९ ऑक्टोबरला सकाळी बरोब्बर ७ वाजता गाडी आली. आम्ही हॉटेलचे व्यवहार पुर्णकरून निघालो. लक्कडी गावातील 'स्पाईस बाउल' मध्ये गरम केरळी नाश्ता केला. आणि निघालो. सकाळच्या कोवळया उन्हातील लक्कडी व्ह्यू पॉईंट डोळ्यात साठवत ( कारण कलिकत गाठायचं होत ना ! ) घाट उतरून दहा वाजण्याच्या सुमारास विमानतळावर पोहोचलो. सामान गो इंडिगो कडे सुपूर्द करून सुरक्षा तपासणी होईस्तोवर साडेदहा वाजले. ११.५० ला विमानाचे दरवाजे बंद होऊन ११.५५च्या सुमारास विमानं धावपट्टीवरून उडाले सुद्द्धा. परतीचा आमचा प्रवास पश्चिम किनारपट्टीवरून होणार होता. जातांना आम्ही पुणे - कराड – कोल्हापूर - बेळगाव असे गेलो. आता गोवा – रत्नागिरी करीत मुंबईच्या जवळ आलो आणि अचानक विमान समुद्रात आतमध्ये भूजच्या दिशेने जाऊ लागले. मुंबई उजवीकडे खूपच मागे पडली. अखेर १५ – २० मिनिटांनी एअर ट्राफिक कंट्रोलर ने मुंबईला उतरण्याचा इशारा करताच दीड – पावणे दोनच्या सुमारास आम्ही सांताक्रूझ विमानतळावर उतरलो. अनेक आठवणी छायाचित्र घेऊन घरी परतलो ते न पाहिलेले वायनाड पुन्हा पाहण्याचा निश्चय करूनच.



**जग सुंदर आहेच.**

पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक अणि कवी देतात.

**केशवसुत म्हणतात**

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य “जाणवू” लागले. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी भरपूर पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला...” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा

esahity@gmail.com